जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 7 SEP 2026
पुढारी

# जयसिंगपुरात मंगळवारी जिल्हास्तरीय युवा महोत्सव

**जयसिंगपूर : पुढारी वृत्तसेवा**

कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाचा ४६ वा एकदिवसीय जिल्हास्तरीय युवा महोत्सव मंगळवार, दि. २९ रोजी जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर येथे आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवात जिल्ह्यातील शिवाजी विद्यापीठाशी संलग्न ८६ महाविद्यालयांमधील सुमारे १ हजार ५२० विद्यार्थी कलाकार सहभागी होणार असल्याची माहिती प्राचार्य डॉ. सुरत मांजरे यांनी दिली.

प्राचार्य डॉ. मांजरे म्हणाले, शिवाजी विद्यापीठाच्या युवा महोत्सवामध्ये विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देणाऱ्या विविध वैयक्तिक व सांघिक कला प्रकारांच्या स्पर्धा होणार आहेत. यामध्ये लोकनृत्य, लोककला, मूकनाट्य, लघुनाटिका, लोकसंगीत, एकल लोकवाद्य वादन, वादविवाद, मराठी, हिंदी व इंग्रजी वक्तृत्व, पथनाट्य, प्रश्नमंजुषा, एकांकिका, सुगम गायन, भारतीय समूहगीत आणि एकपात्री अभिनय आदी स्पर्धांचा समावेश आहे.

महोत्सवाचे उद्घाटन स. ९.३० वा. शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते होणार आहे. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक, शिवाजी विद्यापीठ युवा महोत्सव संयोजन समितीचे पदाधिकारी व सदस्य, कोल्हापूर जिल्हा समन्वयक डॉ. आर. एच. अतिग्रे यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन डॉ. सुभाष अडदंडे राहणार आहेत. सचिव डॉ. महावीर अक्कोळे, प्रा. डॉ. संदीप तापकीर, संयोजन समितीचे सर्व सदस्य उपस्थित राहणार आहेत.

2 7 SEP 2026
पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचा २९ रोजी युवा महोत्सव

**जयसिंगपूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचा ४६ वा एकदिवसीय जिल्हास्तरीय युवा महोत्सव मंगळवार, दि. २९ रोजी जयसिंगपूर कॉलेज येथे आयोजित केला आहे. या महोत्सवात जिल्ह्यातील शिवाजी विद्यापीठाशी संलग्न ८६ महाविद्यालयांमधील सुमारे १,५२० विद्यार्थी कलाकार सहभागी होणार आहेत.

युवा महोत्सवामध्ये विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देणाऱ्या विविध वैयक्तिक व सांघिक कला प्रकारांच्या स्पर्धा होणार आहेत. यामध्ये लोकनृत्य, लोककला, मूकनाट्य, लघुनाटिका, लोकसंगीत, एकल लोकवाद्य वादन, वादविवाद, मराठी, हिंदी व इंग्रजी वक्तृत्व, पथनाट्य, प्रश्नमंजूषा, एकांकिका, सुगम गायन, भारतीय समूहगीत आणि एकपात्री अभिनय आदी स्पर्धांचा समावेश आहे.

या महोत्सवाचे उद्घाटन सकाळी ९.३० वाजता विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते होणार आहे. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक, शिवाजी विद्यापीठ युवा महोत्सव संयोजन समितीचे पदाधिकारी व सदस्य, जिल्हा समन्वयक डॉ. आर. एच. अतिग्रे यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन डॉ. सुभाष अडदंडे असून, सचिव डॉ. महावीर अक्कोळे, स्थानिक संयोजन समितीचे प्रमुख प्राचार्य डॉ. सुरत मांजरे, स्थानिक संयोजन सचिव प्रा. डॉ. संदीप तापकीर, तसेच संयोजन समितीचे सर्व सदस्य उपस्थित राहणार आहेत.

या वर्षीच्या महोत्सवाचे जिल्हास्तरीय यजमानपद जयसिंगपूर कॉलेजला मिळाले असून, तयारी अंतिम टप्प्यात आली आहे, अशी माहिती प्राचार्य डॉ. सुरत मांजरे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 SEP 2026
सकाळ

# जयसिंगपूरमध्ये उद्या जिल्हा युवा महोत्सव

जयसिंगपूर, ता. २६ : शिवाजी विद्यापीठाचा ४६ वा एकदिवसीय जिल्हास्तरीय युवा महोत्सव मंगळवारी (ता. २९) जयसिंगपूर कॉलेजमध्ये आयोजित करण्यात आला आहे. महोत्सवात जिल्ह्यातील शिवाजी विद्यापीठाशी संलग्न ८६ महाविद्यालयांमधील सुमारे १५२० विद्यार्थी कलाकार सहभागी होणार आहेत.

युवा महोत्सवामध्ये विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देणाऱ्या विविध वैयक्तिक व सांघिक कला प्रकारांच्या स्पर्धा होणार आहेत.